क्र. १३२ पहिले वर्ष

५ मार्च २०२३

# रविवारची उपासना

## प्रायश्चित्तकाळातील दुसरा रविवार

### प्रस्तावना

प्रभू येशू देवाचा परमप्रिय पुत्र असून जगातील सर्व प्रकारचा अंधकार नाहीसा करणारा प्रकाश आहे. आजच्या शुभवर्तमानातील प्रभू येशूच्या रुपांतराचा साक्षात्कार पाहून पेत्र, याकोब व योहान भयभीत झाले. परमेश्वराच्या तेजस्वी प्रकाशाने जगातील सर्व प्रकारच्या अंधकाराला नष्ट केले आहे. ख्रिस्ताने आपल्या सर्वांना त्याचा तारणदायी प्रकाश बहाल केला असून तो इतरांपर्यंत पोहचविण्यास पाचारण केले आहे. ख्रिस्त म्हणतो, ''तुम्ही जगाचा प्रकाश आहा. तुमचा प्रकाश लोकांसमोर असा पडू द्या की, त्यांनी तुमची सत्कर्मे पाहून तुमच्या स्वर्गातील पित्याचा गौरव करावा.'' प्रभू येशूला शुध्द अंत:करणाने आणि श्रध्देने अनुसरण्यास आपल्याला ज्ञानाचा, प्रेमाचा व परस्पर सेवेचा आंतरिक प्रकाश मिळावा म्हणून आपण प्रभूकडे ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, तुझ्या पुत्राचे शब्द ऐकण्यासाठी आम्हांला साहाय्य कर. तुझ्या शब्दाने आम्हांला प्रकाशित कर. तुझ्या वैभवराज्याच्या दिशेने वाटचाल करण्यास आम्हांला मार्गदर्शन कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### प्रभूशब्द विधी पहिले वाचन

**उत्पत्ती या पुस्तकातून घेतलेले वाचन १२:१-४**

**''परमेश्वराच्या लोकांचा पिता अब्राहाम याचे पाचारण''**

परमेश्वराने अब्राहामला सांगितले, ''तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा. मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन. मी तुला आशीर्वाद देईन. तुझे नाव मोठे करीन. तू आशीर्वादित होशील. तुझे अभिष्ट चिंतीतील त्यांचे मी अभिष्ट करीन. तुझे जे अनिष्ट चिंतीतील त्यांचे मी अनिष्ट करीन. तुझ्याद्वारे पृथ्वीवरील सर्व कृत्ये आशीर्वादित होईल.'' परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे अब्राहाम निघून गेला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**३२: ४-५ अ, १८-१९,२०-२२**

प्रतिसाद : **हे परमेश्वरा, आम्ही तुझी आशा धरली आहे.**

१. परमेश्वराचे वचन सरळ आहे.
त्याची सर्व कृती सत्याची आहे.
त्याला नीती व न्याय ही प्रिय आहेत.
परमेश्वराच्या वात्सल्याने पृथ्वी भरली आहे.

२. पाहा, जे परमेश्वराचे भय धरतात व त्याच्या प्रेमाची अपेक्षा करतात त्यांचा जीव मृत्यूपासून सोडवावा व दुष्काळात त्यांचा प्राण वाचवावा म्हणून त्यांच्यावर त्याची नजर असते.

३. आमचा आत्मा परमेश्वराची प्रतीक्षा करीत आहे, आमचे साह्य व ढाल तोच आहे.
हे परमेश्वरा, आम्ही तुझी आशा धरली आहे म्हणून आम्हांवर तुझी प्रीती असू दे.

### दुसरे वाचन

**पौलाचे तीमथीला दुसरे पत्र यातून घेतलेले वाचन १:८-१०**

**''देव आम्हांला बोलावतो आणि आमचे मन प्रकाशित करतो.''**

आमच्या प्रभूविषयीच्या साक्षीची आणि मी जो त्याचा बंदिवान त्या माझी तू लाज धरू नये, तर देवाच्या सामर्थ्याच्या परिणामाने शुभवर्तमानासाठी माझ्याबरोबर दु:ख सोसावे. त्याने आपल्या कृत्यानुसार नव्हे तर स्वत:च्या संकल्पानुसार व कृपेनुसार आम्हांला तारले व पवित्र पाचारणाने बोलावले आहे. ही कृपा युगाच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्याठायी आम्हावर करण्यात आली होती. ती आता आपला तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या प्रगट होण्याने दृश्यमान झाली आहे. त्याने मरण नाहीसे केले आणि शुभवर्तमानाद्वारे जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहेत.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय १०:५**

**आलेलुया, आलेलुया**

तेजस्वी मेघातून पित्याची वाणी ऐकू आली.
''हा माझा प्रिय पुत्र आहे. ह्याचे तुम्ही ऐका.''

**आलेलुया**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**१७:१-९**

**''येशूचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले.''**

सहा दिवसानंतर येशूने पेत्र, याकोब व त्याचा योहान ह्यांना आपणाबरोबर एका उंच डोंगरावर एकांती नेले. तेव्हा त्याचे रुप त्यांच्यादेखत पालटले; त्याचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली. तेव्हा पाहा, मोशे व एलिया हे त्याच्याबरोबर संभाषण करीत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. मग पेत्र येशूला म्हणाला, ''प्रभूजी, आपण येथे असणे हे आपल्याला बरे आहे. आपली इच्छा असली तर मी येथे तीन मंडप उभारतो. आपणासाठी एक, मोशेसाठी एक व एलियासाठी एक.'' तो बोलत आहे तो पाहा, तेजस्वी मेघाने त्यांच्यावर छाया केली आणि मेघातून वाणी झाली, ''हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे. ह्याविषयी मी संतुष्ट आहे. ह्याचे तुम्ही ऐका.'' हे ऐकून शिष्य जमिनीवर पालथे पडले व

फार भयभीत झाले. तेव्हा येशूने जवळ येऊन त्यांना स्पर्श करून म्हटले, ''ऊठा, भिऊ नका.'' तेव्हा त्यांनी दृष्टी वर करून पाहिले तो येशूशिवाय कोणी त्यांना दिसला नाही.

नंतर ते डोंगरावरून खाली येताना येशूने त्यांना आज्ञा केली की, ''मनुष्याचा पुत्र मेलेल्यातून उठवला जाईपर्यंत हा साक्षात्कार कोणालाही सांगू नका.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :**

माझ्या बंधुभगिनींनो, आम्हांला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषत: या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे : ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

आपला प्रतिसाद असेल – करुणा कर रे प्रभुजी, आलो तुझिया चरणी आम्ही.

१. आपले आध्यात्मिक मेंढपाळ बिशप (नाव), यांना त्यांच्या कामात प्रभूचा सतत वरदहस्त लाभावा व त्याच्या नेतृत्वाखाली आपल्या धर्मप्रांताची प्रगती होत राहावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या धर्मग्रामात जे विकलांग आहेत, त्यांनी निराश न होता, प्राप्त परिस्थितीचा सकारात्मक दृष्टिकोनातून स्वीकार करावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. प्रत्येक पालकाने आपल्या स्वत:च्या आचारणातून आपल्या लेकरांपुढे ख्रिस्तसभेच्या नीतिनियमांचा आदर्श ठेवावा व आपल्या मुलाबाळांवर चांगले संस्कार घडवून आणावेत, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. जागतिक मंदीमुळे ज्या तरुणांना नोकरीधंदा मिळू शकत नाही, अशा गरजवंतांना पवित्र मरियेच्या मध्यस्थीने योग्य तो मार्ग दिसावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक गरजां साठी, आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंत:करणाने ते तुझी सेवा करोत. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आम्हांला पवित्र कर. या ख्रिस्तबलिदानाद्वारे आमची पापापासून मुक्तता कर व पुनरुत्थानाचा सण करण्यास आम्हांला लायक बनव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या पवित्र संस्काराबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. या संस्काराद्वारे या पृथ्वीवरच आम्हांला आगामी जीवनातील आनंदाचा अनुभव दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

प्रायश्चित्तकाळात मानवाने आपल्या सुरक्षा कवचातून बाहेर पडावे आणि स्वर्गराज्यातील शांती आणि कृपा ह्यांचा आस्वाद घ्यावा यासाठी भाविकांना आवाहन करण्यात येते. आजच्या वाचनातून विविध प्रकारे हा प्रवास वर्णन करण्यात आलेला आहे.

**अ) वचनदत्त भूमी कनानमध्ये प्रवेश करण्यासाठी हारानरूपी मायभूमी सोडावी लागते :** पहिल्या वाचनात (उत्पत्ती १२:१–४) परमेश्वराने अब्राहामला केलेल्या पाचारणा विषयी आपण ऐकतो. आपली मायभूमी सोडून देवाने देऊ केलेली वतनभूमी आब्राहाम नम्रपणे, आज्ञाधारकपणे व त्यागी वृत्तीने स्वीकारतो. मात्र ह्या प्रवासात कधी कधी 'आत्म्याची काळी रात्र' आणि 'वैराण वाळवंट' अनुभवावे लागते.

**ब) देवाच्या योजना स्वीकारण्यासाठी स्वत:च्या योजनांचा त्याग करावा लागतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात (२ तीमथ्य १:८ब–१०) संत पौल आपल्यासमोर ईश्वराची योजना उलगडून दाखवतो. अशी योजना नक्कीच मानवाच्या छोट्या छोट्या संकल्पांपेक्षा निराळी असते. आपल्या योजना किती छोट्या किंवा मोठ्या असतात ते महत्त्वाचे नसून त्या देवाच्या योजनेशी सुसंगत आहेत की नाहीत ते महत्त्वाचे असते.

**३) आध्यात्मिक जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी भौतिक जीवनाची आसक्ती सोडावी लागते :** प्रभू येशू ख्रिस्त लोकांच्या जीवनाशी समरस झालेला होता. परंतु देवपित्यावरून त्याची दृष्टी जराही ढळली नाही. आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १७:१–९) येशूच्या रूपांतराचा प्रसंग वर्णन करण्यात आलेला आहे. हा आध्यात्मिक अनुभव घेण्यासाठी येशू आपल्या तीन प्रेषितांना एकांती एका उंच डोंगरावर घेऊन जातो. प्रायश्चित्तकाळात ख्रिस्तसभा आपल्याला आध्यात्मिक जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी भौतिक जीवनाची आसक्ती सोडण्याचे आवाहन करते.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनातील हारानातून कनानकडे, स्वत:च्या योजनांकडून ईश्वरी योजनांकडे आणि भौतिकवादाकडून अध्यात्माकडे कोणत्या प्रकारचा प्रवास करण्याची गरज आहे? ●●●

| मार्च २०२३ | बायबल वाचने | | दुसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम ०६ | कॉर्बीची सं कॉलेट (जां) | : दानीएल ९:४–१०/ लूक ६:३६–३८ | |
| मंगळ ०७ | सं पर्पेतुआ आणि फेलिसिटी (जां) | : यशया १: १०,१६–२०/मत्तय २३: १–१२ | |
| बुध ०८ | देवभक्त सं जॉन (जां) | : यिर्मया १८:१८–२०/मत्तय २०: १७–२८ | |
| गुरु ०९ | रोमचे सं फ्रान्सिस (जां) | : यिर्मया १७:५–१०/लूक १६:१९–३१ | |
| शुक्र १० | सं युलोजिअस (जां) | : उत्पत्ती ३७:३,४,१२,१३,१७–२८/मत्तय २१: ३३–४६ | |
| शनि ११ | सं थिओफानेस (जां) | : मीखा ७:१४,१५,१८–२०/लूक १५:१–३, ११–३२ | |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

DON BOSCO PUNE

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)